जाहीर नोटीस

शहर पुणे, मौजे कोथरूड येथील स.नं. ४९/१/३अ व ४९/१/३ब चे मंजूर ले-आऊटमधील प्लॉट नं.१० यांसी स.नं.४९/३अ/३ब/७, सि.स.नं.१६५१ (पैकी) यांसी एकूण क्षेत्र ५७८५ चौ.फूट म्हणजेच ५३८ चौ.मी. ही मिळकत त्यावरील लौकिक अपार्टमेंट नामक या इमारतीसह, यांसी **चतु:सीमा-** पूर्वेस: ३० फूटी रस्ता, दक्षिणेस: प्लॉट नं.११, पश्चिमेस: स.नं.४९/१/३अ, उत्तरेस: प्लॉट नं.९, येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक मिळकतीचे विद्यमान मालक- (१) श्री. अतुल सुभाष सोनसळे, (२) श्री. विनायक प्रभाकर निगुडकर, (३) श्री. राजेंद्र मधुकर हडपसरकर व सौ. निलांबरी राजेंद्र हडपसरकर, (४) सौ. प्रिया आनंद डांगे व श्री. आनंद अरुण डांगे, (५) श्री. हरीहर शंकरराव शामराव, (६) श्री. प्रसाद सतीश शेणोलीकर, (७) श्रीमती जया नारायण वाळवेकर, (८) सौ. सुधन्वा सुधाकर घारपुरे, (९) श्री. रवींद्र प्रभाकर नगरकर, (१०) सौ. तारा पखले उर्फ तारा जगदीश ठक्कर, यांनी सदर मिळकतीतील आपआपले अविभक्त हिस्से आमचे अशिलांना पुनर्विकसनासाठी देण्याचे मान्य व कबूल करून रितसर समजुतीचा करार करून दिला आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती केवळ उपरोक्त मालकांनाच पुर्नविकसनासाठी देण्याचा हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमचे अशीलांस दिला आहे. तरी सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचा कसल्याही प्रकारे मालकी हक्क, दावा अगर हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आम्हांस लेखी कळवावे व कागदपत्रांनिशी खात्री पटवावी, अन्यथा सदरील मिळकत निर्वेध व निजोखमी असून इतर कोणाचा काहीही हक्क, हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे असे समजले जाईल व नंतर कोणाची, कसलीही तक्रार चालणार नाही.

ता. १२.०८.२०२१ स्वाक्षरी/-

- श्री. प्रदीप मनोहर खिरे, ॲडव्होकेट
'साकेत' ४४/५४, नवसह्याद्री सोसायटी, पारिजात गल्ली,
कर्वेनगर, पुणे ४११०५२. फोन नं.२५४२०५७९/२५४६२२२४.

जाहिर सूचना

आम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, येथील निम्न लिखीत अनुसूचित अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या तव इथून पुढे एकत्रितरित्या उक्त मालमत्ता असे संबोधिलेल्या जमिनीच्या खंडांवरील, वसन्त मोतिबाग, वाडारोड, राजगुरुनगर, पुणे ४१०५०५ येथे राहणार भारतीय रहिवासी सचिन प्रकाश भन्साली यांच्या नामाधिकाराचा तपास आम्ही करीत आहोत.

विक्री, मालकीहक्क, हस्तांतरण, अभिहस्तांकन, अदलाबदल, दोषारोप, बोजा, कुळवहिवाट, पोट-कुळवहिवाट, पट्टा, पोटपट्टा, लायसेन्स, गहाण, वारसा, भेट, धारणाधिकार, देखभाल, मृत्यूपत्रित देणगी, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था, सुविधाधिकार, अनुदान, न्यास, प्रसंविदा, ताबा, विकास अधिकार, करार, समझोता, अभिहस्तांकन, न्यायालयाचा आदेश/ हुकूमनामा/ निकाल, जप्ती, मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडींग, नोटीस स्वरुपात, किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपात मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर अथवा त्याबाबत कोणताही हिस्सा, हक्क, नामाधिकार, संपदा, हितसंबंध, दावा अथवा कोणत्याही प्रकारची मागणी असलेल्या किंवा असल्याचा दावा सांगणाऱ्या वित्तीय संस्था, सोसायटी, फर्म, वैधानिक प्राधिकरणे, (कॉर्पोरेट वा अन्यथा) संस्था यांसह सर्व व्यक्तींनी मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत त्यांचे हक्क ज्यावर आधारलेले आहेत आणि ज्यावरुन ठामपणे सांगितले जात आहेत अशा नोटराईज्ड कागदोपत्री पुराव्यासह ते लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांकडे येथील उल्लेखित पत्त्यावर आणि ईमेल आयडीवर आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १०(दहा) दिवसांत कळविणे याद्वारे आवश्यक आहे. जसे न झाल्यास, असा दावा, मागणी, हक्क, नामाधिकार, हितसंबंध, वाद, मागणी किंवा आक्षेप, असल्यास, सोडून देण्यात आल्याचे आणि/ अथवा मागे घेण्यात आल्याचे मानले जाईल.

अनुसूची
(मालमत्तेचे वर्णन)

गाव वराळे, तालुका खेड आणि जिल्हा पुणे येथे स्थित, पडलेल्या व असलेल्या एकूण ६ हेक्टर ४३.९३ आर्स शेत जमिनीचे पुढील सर्व हिस्से आणि खंड :

गट क्र./ हिस्सा क्र.	क्षेत्रफळ (हेक्टर-आर्स)
३१	३-९०.०० पैकी ३-८४.५८
३२	२-६३.०० पैकी २-५९.३५

दिनांकित १३ ऑगस्ट २०२१

मेसर्स देसाई ॲन्ड दिवाणजी
स्वाक्षरी/-
रुझबेह जे. एस. मिस्त्री
भागीदार
ॲडव्होकेट्स सॉलिसिटर्स ॲन्ड नोटरीज
लेन्टिन चेम्बर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१
ईमेल: rmistry@desaidwanji.com, anuja.thakar@desaidiwanji.com

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

प्रादेशिक कार्यालय,पुणे - पतवसुली तसेच कायदेशीर सेवा विभाग

शाखा : पुणे - पुर्व, ६/७, शिवाजीनगर, जीवन प्रकाश बिल्डिंग, १ ला मजला, एल आय सी - डी.ओ. युनिव्हर्सिटी रोड, पुणे - ४११ ००५

स्थावर मिळकतींकरीता नियम ८ (१) अन्वये ताबा नोटीस

ज्याअर्थी, खालील सही करणार हे युनियन बँक ऑफ इंडिया, साई गणेश कॉम्प्लेक्स, कर्वेनगर,पुणे - ४११०५२, चे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ यांना प्राप्त झालेल्या कलम क्र. १३ (१२) अन्वये सिक्युरिटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ व नियम ३ नुसार १४.०५.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या नोटीसीनुसार खाली उल्लेखलेल्या कर्जदार/जामिनदार - **१. श्री. सुशिल रमेश दोशी आणि २. सौ. निता रमेश दोशी** यांनी थकबाकी रक्कम रु. ३१,५०,७०३.५२ (रुपये, एकतीस लाख पन्नास हजार सातशे तीन व पैसे बावन्न मात्र) तसेच त्यावरील व्याज नोटीस मिळाल्यानंतर ६० दिवसांचे आत भरण्याची मागणी नोटीसाने केली होती.

परंतु कर्जदार यांनी आज अखेर नोटीशीमध्ये नमूद केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व इतर तमाम लोकांस कळविण्यात येते की कायदा कलम १३ च्या उप-कलम (४) च्या नियम ८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार खाली सही करणाऱ्या अधिकृत अधिकाऱ्याने खाली उल्लेखलेल्या मिळकतींचा दि. ०६ ऑगस्ट २०२१ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

उपरोक्त कर्जदार आणि तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदर मिळकतीं विषयी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये, जर कोणी असा व्यवहार केल्यास तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही व सदर मिळकतींवरील युनियन बँक ऑफ इंडिया, साई गणेश कॉम्प्लेक्स, कर्वेनगर, पुणे - ४११०५२, यांचा वरील थकबाकी रु. ३१,५०,७०३.५२ (रुपये, एकतीस लाख पन्नास हजार सातशे तीन व पैसे बावन्न मात्र) तसेच त्यावरील व्याज यांचा बोजा अबाधित राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थावर मिळकतीचे वर्णन : खालील मालमत्तेचा सर्वसमावेशक भाग

सदनिका क्र.-११०३, अ विंग, ११ वा मजला, महावीर डिलाईट, कोंढवा बुद्रुक,
ता. हवेली, पुणे - ४११०४८.
सदर फ्लॅट्च्या चतु:सीमा खालीलप्रमाणे : -

उत्तरेस : फ्लॅट नं. - ११०३
दक्षिणेस : डक्ट जिना
पूर्वेस : प्रवेशद्वार व फ्लॅट नं. - ११०२
पश्चिमेस : मोकळी जागा

स्थळ : पुणे
दिनांक : ०६/०८/२०२१ टिप : स्वैर भाषांतर तफावत असल्यास इंग्रजी जाहिरात पहा **अधिकृत अधिकारी**

जाहीर नोटिस

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. विजय बन्सीलाल वाल्मीक व सौ. सविता विजय वाल्मीक** रा. मांजरी बु., ता. हवेली जि. पुणे ४१२३०७ यांची खरेदी मालकी हक्काची असुन सदर प्लॉट मिळकत व त्यावरील आर.सी.सी बांधकाम आमचे अशील **श्री. शैलेश सुदाम शिंदे व सौ. सुनंदा सुदाम शिंदे** यांना खरेदी करण्याची आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही वहाण, दान, बक्षिस, लिज, खरेदी, दावा, सामाईक मालकी तत्सम हक्क अगर हितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ८ (आठ) दिवसांत संबंधित मुळ कागदपत्रासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहच घ्यावी. अन्यथा सदरचे मुद्दाहित कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे आणि ज्या कोणाचा काही हक्क, अधिकार असल्यास त्यांनी तो जाणिवपूर्वक सोडून दिला आहे, असे गृहित धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे परिशिष्ट : तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली मे. सह-दुय्यम निबंधक साहेब, हवेली ,जिल्हा परीषद पुणे, तालुका पंचायत समिती, हवेली ग्रामपंचायत हद्दीतील **गाव मौजे मांजरी बु.** ता. हवेली जि. पुणे येथील मिळकत **स. नं. १५६/७अ/१ यांसी एकुण क्षेत्र ०० हे. ३१आर अधिक पो.ख. ०० हे. ३ आर असे एकुण क्षेत्र ०० हे. ३४ आर, पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे संपुर्ण क्षेत्र १००० चौ. फुट म्हणजेच ०० हे. ०१ आर व त्यावरील आर.सी.सी. बांधकाम ७५० चौ.फुट ही मिळकत यासी मिळकत नं. ३/००९६** हक्कासह दरोबस्त. येणेप्रमाणे जाहीर नोटीस

उध्दव वाखुरे, ॲडव्होकेट
पुणे - दि. १३/०८/२०२१ एस आर २, मेगा सेंटर, हडपसर, पुणे - १३. मो. नं. - ८६०५७४४३४९

KPIT केपीआय्टी टेक्नॉलॉजीज् लिमिटेड

सीआयएन: एल७४९९९पीएन२०१८पीएलसी१७४१९२
नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: प्लॉट नं. १७, राजीव गांधी इन्फोटेक पार्क, एमआयडीसी-सेझ, फेज - ३,माण, तालुका- मुळशी, हिंजवडी, पुणे - ४११०५७.
दूरध्वनी क्र.: +९१ २० ६७७० ६०००
ई-मेल: grievances@kpit.com **संकेतस्थळ:** www.kpit.com

केपीआयटी टेक्नॉलॉजीज् लिमिटेड यांच्या बुधवार दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') अन्य दृकश्राव्य माध्यमे (''ओएव्हीएम'') द्वारा होणाऱ्या सभासदांच्या ४ थ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेस पूरकपत्र

माननीय भागधारक,

केपीआयटी टेक्नॉलॉजीज् लिमिटेड (दि ''कंपनी'') यांनी कंपनीच्या सभासदांची ४ थी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. २५ ऑगस्ट २०२१, रोजी सकाळी १०.३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) व्हीडीओ कॉन्फरन्सिंग/(''व्हीसी'') /अन्य दृकश्राव्य (''ओएव्हीएम'') माध्यमांद्वारा आयोजित करण्याच्या संदर्भात दि. २३ जुलै, २०२१ रोजी सूचना (नोटीस ऑफ दि एजीएम) जारी केली आहे. एजीएमची सूचना कंपनीज ॲक्ट २०१३ आणि त्यासह वाचल्या जाणाऱ्या नियमांअंतर्गत असलेल्या अन्य नियमांची योग्य ती पूर्तता करुन दि. ३१ जुलै, २०२१ रोजी सभासदांना पाठविण्यात आली आहे.

एजीएमच्या सूचनेतील विशेष कामकाजातील मुद्दा क्रमांक ५ आणि त्यामधील स्पष्टीकरण करणारे निवेदन हे कंपनीज ॲक्ट, २०१३ मधील सेक्शन १९७ आणि सेबीच्या रेग्युलेशन १७(६) (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स् २०१५ मधील तरतुदींनुसार देय असलेल्या सर्वसाधारण व्यवस्थापकीय मानधनात वाढ करण्याबाबत सभासदांची मान्यता घेण्याच्या संदर्भात आहे. आम्ही ही बाब पुन्हा स्पष्ट करु इच्छितो की हे कंपनीज ॲक्ट २०१३ मध्ये आणि सिक्युरीटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील तरतुदींच्या पूर्ततेनुसारच आहे.

तथापि, स्पष्टीकरणाच्या संदर्भातील निवेदनात अधिक स्पष्टता असावी याकरिता कंपनीने एजीएमच्या सूचनेमधील मुद्दा क्रमांक ५ मधील मूळच्या स्पष्टीकरणामध्ये पूरकपत्र जोडले आहे, त्यानुसार सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्पष्टीकरणाबाबत निवेदनातील या पूरकपत्राची नोंद घ्यावी.

एजीएमच्या सूचनेला असलेले हे पूरकपत्र (''ॲडेंडम'') हा एजीएमच्या सूचनेचा अविभाज्य भाग असेल जी एजीएमची सूचना कंपनीच्या सभासदांना अगोदरच पाठविण्यात आली आहे आणि या तारखेस आणि या तारखेपासून एजीएमची सदर सूचना या पूरकपत्रासह वाचण्यात येईल त्याचप्रमाणे हे पूरकपत्र बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) दि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com)आणि कंपनीचे संकेतस्थळ (www.kpit.com) येथेही उपलब्ध आहे.

एजीएमच्या सूचनेतील मुद्दा क्रमांक ५ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे राखलेल्या आणि या पूरकपत्रानुसार दुरुस्त किंवा पूरक केल्यानुसार असलेल्या मुद्द्यांव्यतिरिक्त अन्य मुद्दे कायम राहतील.

एजीएमच्या सूचनेतील मुद्दा क्रमांक ५ मधील स्पष्टीकरणात्मक निवेदनास पूरकपत्र

विशेष कार्यक्रमाअंतर्गत एजीएमच्या सूचनेत पान नं. ६ आणि ७ वरील मुद्दा क्रमांक ५ मध्ये देण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक निवेदना व्यतिरिक्त आम्ही सर्वसाधारण व्यवस्थापकीय मानधनात वाढ करण्याबाबतचा आधार प्रकट करीत आहोत की, ज्यासाठी कंपनीच्या सभासदांची मान्यता मागितली जात आहे.

१) व्यवस्थापकीय संचालक, पूर्णवेळ संचालक आणि व्यवस्थापक यांच्यासह आपल्या संचालकांना कोणत्याही आर्थिक वर्षात, कंपनीज ॲक्ट २०१३ मधील सेक्शन १९८ अनुसार करण्यात येणाऱ्या हिशोबानुसार आर्थिक वर्षाबाबत कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या ११% ते १७% एवढी सर्वसाधारण वाढ करणे.

२) कोणत्याही आर्थिक वर्षात कंपनीचे कोणतेही संचालक किंवा अधिक व्यवस्थापकीय संचालक किंवा पूर्णवेळ संचालक यांना कंपनीज ॲक्ट, २०१३ मधील सेक्शन १९७ मधील सब सेक्शन(१) विहित केल्यानुसार खंड (i) अनुसार कंपनीज ॲक्ट २०१३ मधील सेक्शन १९८ अनुसार विहीत करण्यात आलेल्या पध्दतीनुसार हिशोब केल्याप्रमाणे आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स्, २०१५ च्या रेग्युलेशन १७(६)(ई) मर्यादेबाहेर जाऊन कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या ५% किंवा १०%(लागू असल्याप्रमाणे) ही मर्यादा ८% किंवा १५% एवढी वाढविणे.

३) कंपनीच्या अ-कार्यकारी संचालकांना कोणत्याही आर्थिक वर्षात देय असलेल्या कंपनीज ॲक्ट, २०१३ मधील सेक्शन १९८ मध्ये विहित केल्यानुसार हिशोब करुन कंपनीज ॲक्ट, २०१३ च्या सेक्शन १९७ मधील सब सेक्शन(१) मधील बाब (ii) (ए) मध्ये निश्चित केल्यानुसार असलेली मर्यादा १% वरुन २% एवढी करणे .

वर नमूद केल्यानुसार मर्यादांच्या संदर्भातील विशेष ठरावांनुसार सभासदांची मान्यता अर्थिक वर्ष २०२१-२२ पासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी घेण्याचा प्रस्ताव आहे.

जसे की आमचे ध्येय मुख्यतः मोबिलिटी उद्योगाकडे आहे आणि आम्ही यापुढे मोठ्या अंतर्गत संधी आणि बाह्य क्षेत्रात असामान्य अशा संधींच्या उंबरठ्यावर आहोत. येत्या वर्षांमध्ये अनुकूल असे स्वरुपाचे व्यावसायिक वातावरण आम्हास दिसत आहे. संबंधित व्यवसायात तांत्रिक क्षेत्रातील आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील नामवंतांना स्वतंत्र संचालक म्हणून नेमणे आणि आमची क्षमता आणि दर्जा वाढविण्याची योजना आहे. वर नमूद केल्यानुसार व्यवस्थापकीय मानधनातील नियोजित वाढ यासाठी सुविधाजनक ठरेल.

श्री. एस. बी. (रवि) पंडित, श्री. किशोर पाटील, श्री. सचिन टिकेकर, श्री. अनंत तळौलीकर, श्री. बी व्ही आर सुब्बू, प्रो. अलबर्टो ल्युगी संगिओवन्नी विन्सेनटेल्ली, डॉ. निखिल जकातदार आणि त्यांचे नातलग या व्यतिरिक्त कोणी प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती किंवा त्यांच्या नातलगांपैकी कोणी, कोणत्याही मार्गाने, आर्थिक किंवा अन्य बाबतीत या ठरावाशी संबंधित किंवा इच्छुक नाहीत.

श्रीमती शुभलक्ष्मी पानसे यांनी स्वतंत्र संचालक या पदावरुन १७ जून, २०२१ पासून राजीनामा दिलेला आहे. संचालकांपैकी कोणीही एकमेकांशी किंवा प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती किंवा त्यांचे नातलग यांच्याशी नाते असणारे नाहीत.

वर नमूद केल्यानुसार, सूचनेतील मुद्दा क्रमांक ५ मध्ये नमूद केल्यानुसार विशेष ठरावाची संचालक मंडळाकडून भागधारकांच्या मान्यतेसाठी शिफारस करीत आहेत.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
केपीआय्टी टेक्नॉलॉजीज् लिमिटेड साठी
सही/-
निदा देशपांडे
कंपनी सचिव

ठिकाण : पुणे
दिनांक : ऑगस्ट ११, २०२१

Edelweiss Ideas create, values protect — एडेलवाईज हाउसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एडेलवाईज हाउस, सी.एस.टी.मार्गाच्या पलीकडे, कलिना, मुंबई-400098
क्षेत्रीय कार्यालयाचा पत्ता: ऑफिस क्र. 208-210, दुसरा मजला, काकडे वीझ आयकॉन, गणेशखिंड रोड, सीटीएस 2687-बी, भांबुर्डे, शिवाजी नगर, पुणे-411005

सर्फेसी अधिनियम, 2002 च्या अनुच्छेद 8(1) अंतर्गत ताबा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे एडेलवाईज हाउसिंग फायनान्स लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स ॲंड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002(2002 चा 3) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद करण्यात आलेल्या कर्जदारांना मागणी सूचना जारी केल्याज्यांत त्यांना सदर सूचनांमध्ये नमूद रकमांची भरणा करण्याच्या दिनांकापर्यंतच्या सर्व खर्च, शुल्क व अधिभारांसह सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.कर्जदार/सह-कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार/सह-कर्जदारांनाआणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत त्यांना बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत निम्नस्वाक्षरीकारांनी खाली नमूद मालमत्तेचासांकेतिक ताबा घेतलेला आहे.कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये व असा व्यवहार केल्यास तो **एडेलवाईज हाउसिंग फायनान्स लिमिटेडच्या** येथे नमूद रकम तसेच संबंधित दिनांकापासून पुढील व्याज, शुल्क व इतर खर्चांच्या भारधीन असेल.

कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार, अनामत मत्ता, थकबाकी आणि अनुच्छेद 13(2) अंतर्गत पाठविण्यात आलेली मागणी सूचना, त्याअंतर्गत दावा करण्यात आलेली रक्कम आणि ताब्याचा दिनांक इ. खाली नमूद करण्यात आलेले आहे:

1. **कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव व पत्ता, कर्ज खाते क्र. आणि कर्जाची रक्कम:**
1. **फिरोज सरदार खान** (कर्जदार) 2. **रुकसाना फिरोज खान** (सह-कर्जदार), स.क्र. 57/5, गल्ली क्र. ए-23, शिवनेरी नगर, गणराज टॉवरजवळ, कोंढवा, येवलेवाडी एनआयबीएम, पुणे-411018. **कर्ज खाते क्र.** LPUNSTH0000062353
कर्ज करार दिनांक : 29 नोव्हें, 2018. **मागणी सूचनेचा दिनांक:** 19.05.2021
कर्जाची रक्कम: रु. 19,40,000/- (रुपये एकोणवीस लक्ष चाळीस हजार फक्त)
थकबाकी रक्कम: रु. 21,63,923.22/- (रुपये एकवीस लक्ष त्रेसष्ट हजार नऊशे तेवीस आणि बावीस पैसे फक्त)
ताबा दिनांक: 12.08.2021

अनामत मत्तेचे तपशील: सदनिका क्र. 303, तिसरा मजला, सी विंग, क्षेत्रफळ सुमारे 484.00 चौ.फू. म्हणजे 44.96 चौ.मी. सोबत सुमारे 98.00 चौ.फू. म्हणजे 8.92 चौ.मी. चे टेरेस, 'शाह इस्टेट', सर्व्हे क्र. 51, हिस्सा क्र. 2-ए, 2ए/32, 2ए/32/9ब 2बी, कोंढवा खुर्द, तहसील हवेली, पुणे. **चतुःसीमा:** पूर्वेस- सदनिका, पश्चिमेस- लिफ्ट, उत्तरेस- बिल्डींग, दक्षिणेस- सदनिका.

स्थान: पुणे, **दिनांक:** 13.08.2021 (स्या/-)- **प्राधिकृत अधिकारी,** एडेलवाईज हाउसिंग फायनान्स लिमिटेड करिता

BHAGYASHREE LEASING AND FINANCE LIMITED

Regd. Office: 1st Floor, Kumar Capital, 2413, East Street, Camp, Pune 411 001
CIN: L65910PN1994PLC138655
Extract of Unaudited Standalone Results for the Quarter ended 30 June 2021

(Rs. In Lacs)

Sr. No.	Particulars	Quarter Ended			Year Ended
		30.06.2021 (Unaudited)	31.03.2021 (Audited)	30.06.2020 (Unaudited)	31.03.2021 (Audited)
1.	Total income From Operations (net)	4.02	3.90	5.94	15.10
2.	Net Profit/(Loss) for the period (Before tax, exceptional and extraordinary items)	-0.13	1.89	0.66	6.29
3.	Net Profit/(Loss) for the period (Before tax and after exceptional and extraordinary items)	-0.13	1.89	0.66	6.29
4.	Net Profit/(Loss) for the period after tax (after exceptional and extraordinary items)	0.92	0.89	-0.89	2.36
5.	Total Comprehensive income for the period (Comprising profit/(Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)	0.92	0.89	-0.89	2.36
6.	Equity Share Capital	350.01	350.01	350.01	350.01
7.	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Balance Sheet of previous year				-191.73
8.	Earnings Per Share (for continuing and discontinued operations) Basic: Diluted:	0.03	0.03	-0.03	0.07

Note: 1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results is available on the Stock Exchange website (www.bseindia.com). The Statuory Auditors of the Company have carried out the limited review of the above results.

2. The figures for the quarter ended 31 st March 2021 are the balancing figures between the audited figures of the full financial year and unaudited published figures upto the third quarter of the previous financial years. Also the figures upto the third quarter had been reviewed and not subjected to audit.

3. The Company is primarily engaged in a single segment viz. financial services and related activities and therefore the segment reporting is not applicable.

4. Figures have been regrouped and rearranged wherever necessary.

For and on behalf of the Board of Directors
Of Bhagyashree Leasing and Finance Limited
Sd/-
Ameya Jain
Director & CFO
DIN: 01947076

Place : Pune
Date : 12.08.2021

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

अक्कलकोट शाखा : ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१६
ईमेल : vjakka@bankofbaroda.com.

प्रतिकात्मक ताबा नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी यांनी, दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) व रूल ९ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदा यांना त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीस मिळालेल्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, कर्जदार व सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) व रूल ९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार व जामिनदार यांच्या नावासमोर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा **दि. ०९/०८/२०२१ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार, तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **बँक ऑफ बडोदा** यांना खाली नमूद केलेली येणे असलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांच्या अधीन राहील.

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	कर्जदारांची नावे	येणे रक्कम	मागणी नोटीसीची तारीख / ताबा घेतल्याची तारीख
१	**कर्जदार : श्री. विजय मधुकर धुमाळ आणि सौ. रुक्मिणी विजय धुमाळ**	रु. २३,७१,०३१.९३ (रुपये तेवीस लाख एकाहत्तर हजार एकतीस आणि पैसे त्र्याण्णव फक्त) + त्यावरील व्याज	१२/०४/२०२१ / ०९/०८/२०२१
	स्थावर मालमत्तेचा तपशील : पुढील मालमत्तेचा (बिल्डींगचा) सर्वसामाईक भाग : प्लॉट नं. ४१, गट नं. १०३०/२ पैकी, पिरजादे प्लॉटस्, सोलापूर रोड, नोंदणीकरण उप जिल्हा अक्कलकोट आणि जिल्हा सोलापूर येथे, क्षेत्रफळ १५४.७५ चौ. मी., **चतु:सीमा : उत्तरेस :** रस्ता, **दक्षिणेस : मोकळी** जागा, **पूर्वेस :** प्लॉट नं. ४२, **पश्चिमेस :** रस्ता		
२	**कर्जदार :** सौ. जुबेदाबी गुलाब नदाफ, श्री. यासर फिरोज नदाफ आणि सौ. जैनाबी गुलाब नदाफ	रु. ६,२५,५१३ (रुपये सहा लाख पंचवीस हजार पाचशे तेरा फक्त) + त्यावरील व्याज	०२/०२/२०१९ / ०९/०८/२०२१
	स्थावर मालमत्तेचा तपशील : पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग : प्लॉट नं. ५०, गट नं. ७११ पैकी, क्षेत्रफळ १०५ चौ. मी. स्टेशन रोड, नवीन तहसिल ऑफिसजवळ, अक्कलकोट, सोलापूर जिल्हा येथे स्थित, सौ. जुबेदाबी गुलाब नदाफ यांच्या नावावर **चतु:सीमा : पूर्वेस :** ६ मीटर रस्ता, **पश्चिमेस :** गट नं. ७११ पैकी, **दक्षिणेस :** प्लॉट नं. ४९, **उत्तरेस :** प्लॉट नं. ५१		

दिनांक : ०९/०८/२०२१
ठिकाण : अक्कलकोट

मुख्य प्रबंधक व अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ बडोदा

पुणे पीपल्स् को-ऑपरेटीव्ह बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक)
मुख्य कार्यालय: ६०६, सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणे ४११०३० फोन: ०२०-२४४५२३५३/२४४५२८४३/२४४५०६८५

जाहीर लिलावाने विक्रीची नोटीस

''जशी आहे तशी'' या तत्वावर मिळकतीची विक्री

मी खाली सही करणार सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेट ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(१२) अन्वये अधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त झालेलो